**कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा**

**ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र**

**गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल**

**अंक ७९ /२०२०** **दिनांक ०१ /१० /२०२०** **कालावधी ५दिवस**

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २५ /०९ /२०२० ते ०१ /१० /२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०२ /१० /२०२० सकाळी ८:३० पासून ०६ /१० /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५/०९ | २६/०९ | २७/०९ | २८/०९ | २९/०९ | ३०/०९ | ०१/१० | | ०२ /१० | ०३/१० | ०४ /१० | ०५ /१० | ०६ /१० |
| ८.६ | ६.४ | ०.०. | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ८ | १० | १८ | 7 | २ |
| २९.२ | | | | | | | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३४ |
| १८ | | | | | | | किमान तापमान (अं.से) | २६ | २६ | २६ | २६ | २७ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ५ | ६ | ४ | ३ | ३ |
| ९५ | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९२ | ९१ | ९४ | ९४ | ९५ |
| - | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७२ | ७० | ६८ | ७२ | ७२ |
| २.७ | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ३ | ७ | ४ | ४ |
| ई. पू. | | | | | | | वाऱ्याची दिशा | द. | द. | प. | द. | द. |
| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | | | | | | | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | | | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा | | |
| १५.० | | | | | | | ३०६०.८ | | | ४२३३.४ | | |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक ०१ ते ०६ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच पुढील पाच दिवस आद्रता आणि तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.**

**विस्तारित श्रेणी अंदाजानुसार दिनांक ०९ ते १५ ऑक्टोबर, २०२० दरम्यान कोंकण विभागासाठी पर्जन्यमान हा सामान्यपेक्षा कमी राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **फुलोरा ते काढणी अवस्था** | • पुढील पाच दिवस हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्याने तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस वैभव विळ्याने कापणी करून घ्यावी व सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी.<br>• पुढील पाच दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने निमगरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत व गरवे भात फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी.<br>• फुलोरा अवस्थेतील गरव्या भात पिकास नत्र खताची तिसरी मात्रा ७१ किलो युरिया प्रति हेक्टरी देण्यात यावी. |
| **नाचणी** | **पोटरी अवस्था** | • नाचणी पिकावर बुरशीजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ट्रायसायक्लोझोल ७५ % पाण्यात मिसळणार भुकटी किंवा कार्बनडयाजियम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | वाढत्या आर्द्रतेमुळे जास्त पालवी असलेल्या आंब्याच्या झाडांवर बुरशीची वाढ झालेली असते. सद्यस्थितीतील वाढणाऱ्या तापमानामुळे सदर बुरशीची वाढ जोमाने होऊन फांदी मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने गोळा करून नष्ट करावीत, रोगट फांद्या कापून काढाव्यात कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावीत. अशा प्रकारे बागेची स्वच्छता केल्यावर मेटॅलक्झील ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • वाढत्या तापमानामुळे काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **सुपारी** | **वाढीची अवस्था** | • काही ठिकाणी वाढलेली आद्रता आणि ढगाळ वातावरणामुळे सुपारी वर कोळेरोग बुरशी जन्य रोगाचा प्रादुर्भाव फळांच्या देठावर दिसून आल्यास, या रोगाचा नियंत्रणासाठी १% बोरडो मिश्रणाची किंवा ०.३७५ टक्के कॉपर ऑक्सीक्लोराइड ३७ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **पेरणी** | • रब्बी हंगामासाठी रोपे तयार करण्याकरिता वाफसा स्थितीत जमिनीची मशागत करून ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाण्यांची पेरणी करावी. रोपांची मर रोगापासून संरक्षण करण्याकरीता पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी तसेच थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. |
| **पशुपालन** | | • क्रायमिन कॉंगो हेमोरायजिक फिवर या गोचीडापासून पसरणाऱ्या विषाणूजन्य रोगाची जनावरांना लागण होण्याची शक्यता असल्याने, शेतकऱ्यांनी जनावरांच्या गोठ्यात स्वछता राखावी तसेच गोचीडांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास सायपर मेथरीन किंवा डेलटामेथरिन ही प्रतिबंधक औषधे पशू वैद्यकांचा सल्ला घेवून गोठ्यात व जनावरांवरती फवारावे.<br>• शेतकऱ्यांनी गोचीड हाताने काढून टाकणे किंवा मारणे कटाक्षाने टाळावे. गोठा स्वछ करताना हात मोजे, मास्क तसेच गम बुटाचा वापर करावा. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.**